# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.09.2024** **वार – गुरुवार**

---

## विसर्जन

पाच दिवसांच्या गणपतींचं विसर्जन करण्यासाठी पुणे महापालिकेनं १५ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ४२ बांधीव हौद आणि २६५ ठिकाणी ५६८ लोखंडी टाक्यांमध्ये व्यवस्था केली आहे. नागरिकांनी नदी, तलाव अशा नैसर्गिक स्त्रोतांमध्ये मूर्तींचं विसर्जन करु नये, असं घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख आणि उपायुक्त संदीप कदम यांनी सांगितलं.

शास्ती

पुणे महापालिका हद्दीत समाविष्ट असणाऱ्या ३४ गावांमध्ये नागरी सुविधां कमी असल्यानं पिंपरी चिंचवड महापालिकेप्रमाणं पुणे पालिकेनं समाविष्ट ३४ गावातील नागरिकांचा शास्तीकर तातडीनं माफ करावा, अशी मागणी 'आपला परिसर' या संस्थेकडून राज्य सरकारकडं करण्यात आली आहे.

अधिसूचना

फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन्ही गावं पुणे महापालिकेतून वगळून त्यांची नगरपरिषद स्थापन करण्याची अंतिम अधिसूचना राज्य सरकारने काढली आहे. ही दोन गावं २०१७ मध्ये पुणे महापालिकेत समाविष्ट करण्यात आल्यानंतर जास्त मिळकत कर आणि कोणत्याही सुविधा मिळत नसल्याचा दावा करत या गावांना महापालिकेतून वगळण्याची मागणी माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी केली होती. त्यावर प्राप्त झालेल्या साडेचार हजारांहून अधिक हरकती आणि सूचनांवर सुनावणी घेऊन तत्कालीन जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांनी राज्य सरकारला अहवाल सादर केला होता.

शाळा

आळंदी नगरपरिषदेच्या शाळा क्रमांक ४ च्या नवीन इमारतीच्या बांधकामाला अधिक निधी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज दिले. पवार यांच्या हस्ते या शाळेच्या  इमारतीचं बांधकाम, आळंदी मरकळ रस्त्याचं भूमिपूजन, इंद्रायणी रुग्णालय आणि कर्करोग संस्थेतील जनजागृती कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. तसंच चाकण येथील उप जिल्हा रुग्णालय आणि अधिकारी कर्मचारी निवासस्थानाचं भूमिपूजनही पवार यांच्या हस्ते करण्यात आलं.

ऊस

केंद्र सरकारनं ऊस नियंत्रण आदेश १९६६ मध्ये काही बदल सुचवून त्यावर सर्व संबंधितांकडून सूचना आणि हरकती मागविल्या आहेत. तसंच या कायद्यातील प्रस्तावित बदलांनंतर साखर नियत्रंण आदेश २०२४ असा नवा कायदा घोषित केला जाणार आहे. त्यावर विचारविनिमय करून निर्णय घेण्यासाठी राज्य सहकारी साखर कारखाना संघाच्या वतीनं साखर आयुक्तालयात एक बैठक संघाचे अध्यक्ष पी.एन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. साखर आयुक्त डॉक्टर कुणाल खेमनार यांच्यासह ४० सहकारी साखर कारखान्यांचे कार्यकारी संचालक यावेळी उपस्थित होते.

छंदगणेश

पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग प्रशालेत सुरू असलेल्या छंद गणेशोत्सवाची सांगता आज गणेश विसर्जनानं झाली. शाळा समिती अध्यक्ष डॉक्टर शरद अगेरखेडकर यांच्या हस्ते प्रशालेतच जल कुंभात गणेश मूर्तीचं विसर्जन करण्यात आलं. फरासखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक अरुण घोडके  प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. छंद गणेशोत्सवानिमित्त झालेल्या विविध स्पर्धांमधील 140 विजेत्या स्पर्धकांना मुख्याध्यापिका चारुता प्रभुदेसाई यांच्या हस्ते बक्षिसांचं वितरण करण्यात आलं.

शालेय साहित्य

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेनं विद्यार्थ्यांना शालेय साहित्यवाटपासाठी थेट लाभ हस्तांतरण  उपक्रमाच्या अंतर्गत आतापर्यंत ४९,००० विद्यार्थ्यांना रेनकोट, शूज, शालेय साहित्याच्या संचाचं  वितरण केलं आहे.  शिक्षण विभागाकडं असणारे पालकांचे चुकीचे मोबाइल क्रमांक आणि शाळांना असणाऱ्या सुट्यांमुळं होणारा विलंब आणि विक्रेत्यांच्या साहित्याबाबतची गुणवत्ता पडताळणी यासारख्या अडचणींचा सामना यामध्ये करावा लागला.

विघ्नहर्ता

पुणे पोलीस विघ्नहर्ता न्यासच्या वतीने दरवर्षी पुण्यातील विविध गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीतील मार्गांवर अहोरात्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा पुरवण्यासाठी यंदा सहभागी होण्यास इच्छुक व्यक्तिंनी संपर्क साधावा, असं आवाहन पुणे पोलीस विघ्नहर्ता न्यासाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

वीजचोरी

वीज चोरी प्रकरणी दाखल असलेल्या तक्रारीत करण्यात आलेल्या दंड आणि बिलाच्या रक्कमेत आता १५ टक्के सवलत मिळणार आहे. २८ सप्टेंबरला आयोजित लोकअदालतीत सादर केलेल्या प्रकरणांना ही सवलत दिली जाणार असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांनी दिली.

हॉकी

पुण्यात सुरु असलेल्या चौथ्या हॉकी इंडिया वरिष्ठ पुरुष आंतरविभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत आजपासून उपांत्य पूर्व फेरीतील संघांच्या लढतीना सुरुवात झाली. गत विजेत्या पेट्रोलियम क्रिडा प्रोत्साहन मंडळानं चमकदार खेळ करत पोलाद कारखाने क्रिडा मंडळाचा 6-2 असा पराभव करत उपांत्य फेरी गाठली. तर अटीतटीच्या सामन्यात सेवा क्रीडा नियंत्रक मंडळ संघानं भारतीय नियंत्रक आणि लेखा परीक्षण संघावर 2-1 असा निसटता विजय मिळवत उपांत्य फेरीतील स्थान पक्कं केलं.

रस्ते

गणेश उत्सवादरम्यान होणारी कोंडी लक्षात घेता पुणे शहराच्या मध्यवर्ती भागातील काही रस्ते 18 सप्टेंबरपर्यंत संध्याकाळी ५ नंतर वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत.  त्यामुळं नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असं आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केलं आहे.

पुणे आणि परिसरात आज पावसाची उघडीप राहिली. उद्या पावसाच्या हलक्या सरी अपेक्षित आहेत. कमाल तापमान 29 अंश सेल्सियस राहील.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**